# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/06/2023 (शनिवार) सकाळ

---

## जबरी चोरी

पो.स्टे. रामटेक :- अंतर्गत १५ किमी अंतरावर पटगोवारी येथे दिनांक ०२/०६/२०२३ चे १४.३० वा. ते १५.०० वा. पर्यत यातील फिर्यादी नामे- प्रतिभा यादव मेवने, वय ४५ वर्ष, रा. पटगोवारी ता. रामटेक जि. नागपुर ही तिचे चहा नाश्त्याचे दुकान सकाळी ०७.०० वाजता उघडुन ग्राहक सांभाळुन दुपारी ०२.३० ते ०३.०० वा. फिर्यादीच्या दुकानाचे बाजुला राहणारी अनिता गोकुल बेवने हिचे सह आपले दुकानात बसली असता गावातील राहणारे **आरोपी नामे- १) दिनेश नारायण भिमटे रा. पटगोवारी २) राजेश वाहाने रा. पटगोवारी ३) रोशन भरत सुर्यवंशी रा. पटगोवारी** हे मोटर सायकलने तिघेही फिर्यादीचे दुकानात आले व दिनेश नारायण भिमटे याने फिर्यादीच्या गावात झालेल्या आमसभेमध्ये झगडयाच्या कारणावरून शिवीगाळ करून ''तुच आहे ना आमसभेत माझ्या बायकोला शिवीगाळ करणारी'' असे म्हणत असतांना राजेश वाहाने हा फिर्यादीचे पाठीमागुन आला फिर्यादीचे तोंड दाबुन ठेवले. तेवढयातच फिर्यादीचे जवळ बसलेली अनिता गेकुल बेवने ही जोरात चिल्लावत असता रोशन भरत सुर्यवंशी याने फिर्यादीचे गळयातील १) सोन्याची १० गहु मणी ५ ग्रॅम, बारीक मणी २० नग १ ग्रॅम, ०३ ग्रॅम सोन्याचे पदक असा एकुण ०९ ग्रॅम सोनं अंदाजे किंमती १०,०००/-रू. २) सोन्याची चैन १२ ग्रॅम किंमती अंदाजे ३०,०००/-रू. असा एकुण ४०,०००/-रूपयाचा मुद्देमाल जबरीने खेचुन मोटर सायकलने पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९२, ५०४, ३४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/अमित कुमार पाण्डेय मो. नं. ९८८१६८३१८४ हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. अरोली :- दिनांक १५/१२/२०२२ ते दिनांक १५/०४/२०२३ चे ००/३० वा. दरम्यान यातील फिर्यादी/पिडीता हिचा आरोपी नामे- निलेश तांडेकर रा. गोंदिया याचे सोबत परीचय असल्याने आरोपी हा फिर्यादी हीचे किरायाचे घरी येवुन कोणत्याही बहाण्याने फिर्यादीचे अंगाला हात लावत असल्याने फिर्यादी हीने आरोपीला म्हटले की, तुम्ही अस करता तुम्हाला पण पोरबाळ पत्नी आहे असे टोकले असता आरोपी म्हणाला की, तु जर तोंड उघडलीस तर मी, तुझा नवऱ्याला आपले दोघाचे संबंध आहे असे तुझा नवऱ्याला सांगुन तुला घराबाहेर काढुन तुझी जिंदगी बरबाद करीन मी, सांगणार तस कर नाही तर मी, तुझा पासुन मरत आहे अशी तक्रार देवुन तुला फसवीन अशी धमकी देवुन फिर्यादी हीचे मनाविरूदध दि. १५.१२.२०२२ ते दि. १५.०४.२०२३ पर्यंत वेळोवेळी धमकी देवुन शारीरिक संबंध प्रस्थापित करीत होता. आरोपीचे त्रासाला कंटाळुन फिर्यादी ही तिचे मुळ गावी आली परंतु आरोपी याने दि. ०१.०६.२०२३ रोजी आरोपीने फिर्यादी हीचे अश्लील फोटो फिर्यादीचे मोबाईवर पाठविल्याने त्याबाबत तिचे पतीला माहीत झाल्याने फिर्यादी हीने घडलेली सर्व घटना तिचे पतीला सांगितली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ A ३७६ (2)(N), ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश बोथले मो. क्र. ९८९०३७५३९६ हे करीत आहे. **(सदर गुन्हा पोस्टे बल्लारशा जि. चंद्रपूर येथे वर्ग करण्यात आला.)**

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर